# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०४२ /२०१०

अर्जदार : श्री अब्दुल बशीर खान
राहणार चौधरी केबल च्या समोर
कामठी रोड, छोटा गुरूव्दारा,
आशिनगर, नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
सिव्हील लाईन विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती के.के घरत
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश ——

पारीत दि. १९.०७.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक ०२.०६.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. अर्जदाराने कमी वापर असतांनासुध्दा ऑक्टोबर २००९ पासुन येणा–या वाढीव विद्युत देयकाबाबत दिनांक २९.०३.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष (अंतनिक), नागपूर शहर मंडळ, नाशप, नागपूर येथे तक्रार अर्ज दाखल केला होता. परंतु सदर अर्जावर कुठलीही कार्यवाही न झाल्यामुळे अर्जदाराने दिनांक ०२.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले. तसेच मंचाला विनंती केली की

   अ. अर्जदाराच्या समक्ष मीटरची चाचणी करण्यात यावी.

   ब. नियमानुसार विद्युत देयके देण्यात यावे.

२. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारी मध्ये असे नमूद केले आहे की त्यांनी गैरअर्जदार यांना ३०.०१.२०१० रोजी, कमी वापर असतांना सुध्दा ऑक्टोबर २००९ पासुन वाढीव विद्युत देयक येण्याबाबत व मीटरची चाचणी करण्याकरीता अर्ज दिले होते. त्यावर गैरअर्जदारातर्फे मीटरची पाहणी करण्यात आली. परंतु पाहणी चे निष्कर्ष अर्जदारास सांगण्यात आले नाही. तेव्हा अर्जदाराने पुन्हा २३.०२.२०१० रोजी गैरअर्जदारास मीटर चाचणीचा अहवाल मागितला त्यावर कनिष्ठ अभियंता, लष्करीबाग वितरण केंद्र यांनी अर्जदाराच्या अर्जावरच लिहुन दिले की त्यांनी आपल्या घरातील अर्थिंगच्या जोडणीची पाहणी करावी. अर्जदाराने आपल्या घरातील अर्थिंगच्या जोडणीची पाहणी करून दिनांक ०८.०३.२०१० रोजी पुन्हा कनिष्ठ अभियंता, लष्करीबाग वितरण केंद्र यांना विनंती केली की घरातील अर्थिंगचे जोडणी बरोबर आहे, तेव्हा सदोष असलेले मीटर बदलवून जुने विद्युत देयक दुरूस्त करून देण्यात यावे.

३. अर्जदाराने पुन्हा २२.०३.२०१० रोजी गैरअर्जदारास लिखीत स्वरूपात कळविले की १०.०३.२०१० रोजी तक्रार असलेले मीटर बदलविण्यात आले व नवीन मीटर बरोबर नोंदी दाखवित आहे. तेव्हा जुने वाढीव/चुकीचे विद्युत देयके दुरूस्त करण्यात यावे व ते भरण्याकरिता हप्त्यांची सवलत देण्यात यावी. यापत्रावर गैरअर्जदाराने कुठलीही कार्यवाही न केल्याने, अर्जदाराने २९.०३.२०१० रोजी (अंतनिक), नाशप, येथे तक्रार दाखल केली परंतु तिथून कुठलेही उत्तर मिळाले नाही. तेव्हा अर्जदाराने मंचाला विनंती केली की चाचणी विभागात त्यांच्या समक्ष मीटरची चाचणी करून नियमानुसार न्याय देण्यात यावा.

४. गैरअर्जदाराने आपले उत्तर दिनांक १९.०६.२०१० रोजी मंचात दाखल केलेले असुन गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की अर्जदाराने विद्युत देयके कमी करण्याकरीता, मिटर बदलविण्याकरीता व मिटर चे दोष तपासणीकरीता वेळोवेळी अर्ज केलेला आहे. त्यानुसार डिसेंबर २००९ व एप्रिल २०१० मध्ये मिटर बदलविण्यात आले आहेत, परंतु त्यांच्या निर्देशनास असे आले की अर्जदाराच्या घरी तीनदा मीटर लावण्यात आले, ज्यांचे क्रं. १) १०६१२२९, २) ०४२४४५७३ ३) १३११५७६६ असे आहेत व या तीनही मिटरव्दारे सरासरी वापर सारखाच आहे.

गैरअर्जदाराने पुढे असेही नमुद केले की अर्जदाराने तक्रार दाखल केल्यानंतर दिनांक ०९.०६.२०१० रोजी ॲक्युचेक मिटर व्दारे मिटर तपासले असता मिटर बरोबर असल्याचे आढळले. अर्जदाराचे मिटर सुस्थितीत असुन बरोबर वाचन दाखवित आहे, तेव्हा विद्युत देयका मध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे तक्रार खारीज करण्यांत यावी.

५. दिनांक २१.०६.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री एस. आर. गंधेवार, कार्यकारी अभियंता, सिव्हील लाईन विभाग व अर्जदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री मेहबुबखान अब्दुल बशीर खान हे उपस्थित होते.

त्यांनी अर्जदाराची बाजु मांडतांना सांगितले की घरातील विद्युत वापरामध्ये काहीही बदल झालेला नसतांनाही फक्त मीटर बदविल्यामुळे विद्युत देयक वाढीव येत आहे, जे त्यांना मान्य नाही. तसेच मीटरची चाचणी अर्जदारासमक्ष करण्यात आली नाही व त्यामुळे मीटरची चाचणी चाचणी विभागात करण्यात यावी.

६. गैरअर्जदाराने मंचासमोर आपले स्पष्टीकरण सादर करतांना सांगितले कि अर्जदाराला त्यांच्या समक्ष मीटर चाचणी करिता दिनांक १४.०६. २०१० रोजी बोलविण्यात आले होते, परंतु अर्जदार नागपूर बाहेर असल्याकारणांने येऊ शकले नाही. तेव्हा पुनश्चः अर्जदारासमोर मीटरची चाचणी करण्यास ते तयार आहेत.

७. दिनांक २१.०६.२०१० गैरअर्जदारातर्फे अर्जदाराच्या घरी त्यांच्या समक्ष केलेल्या मीटरचा तपासणीचा अहवाल मंचात दाखल करण्यात आला. त्यानुसार मीटर दोषरहीत असुन, अर्जदाराच्या घरी २ kW विद्युत भार असुन, अंदाजे त्यांचा वापर सरासरी ४५० युनिट आहे. परंतु अर्जदारास ही तपासणी मान्य नसल्याचे मंचास सांगितले, तेव्हा दिनांक ०५.०७.२०१० रोजी मंचाने चाचणी विभागात अर्जदाराच्या समक्ष मीटर चाचणी करण्याचा आदेश देण्यात आला.

८. दिनांक ०६.०७.२०१० रोजी मंचात सुनावणीची कार्यवाही पुढे सुरू करण्यात आली त्यावेळीस अर्जदाराने सांगितले कि जरी चाचणी मध्ये

विद्युत मीटर दोषरहीत निघाले, तरीही वापर नसतांना येणारे वाढीव विद्युत देयक त्यांना मान्य नाही. तेव्हा नियमानुसार योग्य न्याय देण्यात यावा. तसेच गैरअर्जदाराने मंचाला सांगितले कि मीटर दोषरहित आहे व वापरानुसारच अर्जदाराला विद्युत देयक पाठविण्यात येते आहे.

९. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर व मंचात सादर केलेल्या कागदपत्रावरून मंचाचे असे मत आहे की, मीटर दोनदा बदलविण्यात आले व ते अर्जदारास मान्य आहे. अर्जदाराची अशी तक्रार होती की त्याचे मीटर त्यांच्या समोर तपासण्यात यावे. त्याप्रमाणे दिनांक ०५.०७.२०१० रोजी अर्जदाराच्या समक्ष चाचणी विभागात मिटर तपासण्यात आले व चाचणी अहवालावरून मिटर दोषरहित असल्याचे स्पष्ट होते. तसेच अर्जदाराची मंचा समोर अशी विनंती केली की जरी मीटर दोषरहित आहेत तरीही विद्युत वापरा पेक्षा वाढीव विद्युत देयक येत असल्याने घरात असलेल्या विद्युत भाराच्या आधारावर सरासरी वापरांचे अंदाजित विद्युत देयके देण्यात यावे. परंतु महाराष्ट्र विज नियामक आयोग ( विद्युत पुरवठा
संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५, कलम १५.३.१ अनुसार ---

"जर कोणत्याही कारणामुळे मीटरपर्यंत पोहोचणे शक्य झाले नसेल तर आणि त्यामुळे नोंदी घेतल्या नसतील तर वितरण परवानाधारक ग्राहकास अंदाजित देयक पाठवेल."

परंतु सदर प्ररकरणामध्ये मीटरची नोंदी घेण्यात आली आहे व मीटर चाचणी अहवालानुसार मीटर दोषरहित आहे. तेव्हा अर्जदाराची अंदाजित देयक पाठविण्याची विनंती नियम बाहय असुन ती मंचास मान्य नाही.

१०. अर्जदारास त्याला देण्यात आलेले विद्युत देयक मान्य नसले तरी त्याला ते विद्युत देयक देणे बधंनकारक आहे. तक्रारीची सुनावणी असतांना, अर्जदाराने हप्त्यांने थकीत विद्युत देयक भरण्याची परवानगी मागितलेली आहे. सदर थकीत विद्युत देयक भरण्यास अर्जदारास होत असलेल्या आर्थिक अडचणीचा विचार करून सदर विद्युत देयक चार हप्त्यांत भरण्याची परवानगी देण्यात येत आहे.

दोन्हीही पक्षांचे म्हणणे सविस्तरपणे ऐकल्यानंतर व कागदपत्राचा विचार केल्यानतंर मंच खालील आदेश देत आहे.

## आदेश

१. अर्जदाराची तक्रार असलेले विद्युत देयके दुरूस्त करण्याची प्रार्थना ना मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदाराचे विद्युत देयक हप्त्यात भरण्याची विनंती विचारात घेवुन त्याला थकीत विद्युत देयके चार हप्त्यात भरण्याचे आदेश देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/– | सही/– | सही/– |
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |

सदस्य–सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर